!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४५५ १५-०२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची दुसऱ्यांदा ऑल इंडिया ईएसआयसी फेडरेशनच्या अध्यक्षपदी निवड

**नवी दिल्ली ( ता.१५ ) :** ऑल इंडिया ईएसआयसी फेडरेशन नवी दिल्लीच्या अध्यक्षपदी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची निवड करण्यात आली. पश्चिम बंगला मधील जोका येथे दुसरी ऑल इंडिया ईएसआयसी फेडरेशनची राष्ट्रीय परिषदेत निवड प्रक्रिया पार पडली.

दहा संलग्न युनियनच्या एकमताने २०१६ ते २०१९ पर्यंत तीन वर्षासाठी नव्या कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. खासदार चंद्रकांत खैरे यांची या फेडरेशनवर सलग दुसऱ्यांदा ही निवड झाल्याने गेल्या अनेक वर्षापासुन कर्मचारी व युनियनच्या सदस्यांच्या समस्या सोडविण्याचा मार्ग सुकर झाला असल्याचे युनियन सरचिटणीस किशन चंद यांनी कळवले आहे. ४००० हजाराहुन अधिक वैद्यकिय सराव करणारे ऑल इंडिया ईएसआयसी (मेडीकल) फेडरेशनचे सदस्य आहेत. शिवाय खासदार चंद्रकांत खैरे हे ईएसआयसी कार्यकारीणीचे लोकसभा नियुक्त सदस्य आहेत.

कार्यकारिणी पुढीलप्रमाणे अध्यक्ष खासदार चंद्रकांत भाऊराव खैरे, उपाध्यक्ष पूर्व सुशिलकुमार दास, दक्षिण आर पप्पी रेड्डी, पश्चिम संजयकुमार मंडाल, मध्य राजबिर शर्मा, उत्तर अनिलकुमार वाट्स, सरचिटणीस किशन चंद, वाणिज्य सचिव मनोज द्विवेदी, सहसचिव दिल्ली विनोद दाहिया, राकेशकुमार, हरियाणा सुदीपकुमार, तामिळनाडू एम सारावणाकुमार, तेलंगणा करुणाकरण रेड्डी, केरळ रणजित टी बी, गुजरात प्रभात कुमार, महाराष्ट्र प्रमोद सांळूके, पश्चिम बंगाल कुंणतल क्रांती राय, चंदिगड मणींदर सिंग, मध्यप्रदेश राजेंद्र सिंग आदिंची निवड करण्यात आली आहे. या निवडी नंतर कामगारांना दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यासाठी व ईएसआयसी कर्मचाऱ्यांच्या मागण्या शासन दरबारी मांडून न्याय मिळवून देण्यासाठी सदैव प्रयत्नशिल राहील असे ग्वाही नवनियुक्त अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिली. निवडबद्दल प्रत्येक स्तरातुन त्यांचे अभिनंदन होत आहे.

**प्रसिध्दी प्रमुख**

योगेश पायघन / गणेश वाघ

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525